<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९८०/२०२५ नि. क्र. १ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कलम ८ अन्वये बॉम्बे रेग्युलेशन नुसार वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील मयत **नामदेव व्यंकटराव बिरादार** हे दि.१४/०४/२०११ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत आहे. प्रस्तुत अर्जामध्ये मयत नामदेव व्यंकटराव बिरादार यांच्या **आई कावेरी व्यंकटराव बिरादार** या आवश्यक पक्षकार असल्याने त्या **हयातीत आहेत किंवा कसे** याबाबत अर्जात उल्लेख आढळून येत नाही. त्या मयत असल्यास त्यांचे **मृत्यु प्रमाणपत्र ओळखपत्रासह** अभिलेखावर दाखल करावे. याबाबत अर्जदार यांनी पुर्तता करून युक्तीवाद करावा.

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.06.09 17:27:36 +0530

उदगीर
दि.०९/०६/२०२६

**(के. ए. यादव)**
३ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर